# निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी

पत्ता : १२ वा मजला नॉलेज पार्क , हिरानंदानी बिजनेस पार्क , पवई
मुंबई ४०० ०७६ , संकेत स्थळ http://henergy.com

## जाहिर सुचना

निदार युटिलीटीज आणि मे टाटा पावर वितरण बरोबर झालेल्या विज खरेदी करारावर विद्युत कायदा २००३ च्या कलम ८६ (१) (बी) च्या व त्या आधाराने झालेल्या नियमांच्या अनुषंगाने हरकती / प्रतिक्रिया मागविण्याबाबत.

**प्रकरण क्र. ११७ /२०१७**

१. निदार युटिलीटीज पनवेल एल एल पी यांनी मे टाटा पावर वितरण बरोबर झालेल्या विज खरेदी कराराला मान्यता मिळावी म्हणून विद्युत कायदा २००३ च्या कलम ८६ (१) (बी) च्या अंतर्गत दावा दाखल केलेला आहे.

२. मा. आयोगाने दावा ३१.०१.२०१८ ला दाखल करून वरील करारा संदर्भात हरकती /प्रतिक्रिया मागवण्याबाबत जाहीर सुचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले.

३. मा. आयोगाच्या प्रकरण क्र. ११७ /२०१७ वरील दैनिक आदेशाद्वारे निदार युटिलीटीज पनवेल एल एल पी ला सादर करावयाची माहीती निदार युटिलीटीज पनवेल एल एल पी ने दि. २८ सप्टे. व २७ ऑक्टो. २०१७ ला सादर केली .

४. निदार युटिलीटीज एल एल पी यांच्या सुधारित याचिकेमध्ये, त्यांच्या अंदाजाप्रमाणे, अंदाजित विज मागणीचा, तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**एकूण वीज खरेदी**

| कालावधी | तपशील | वित्तीय वर्ष १७–१८, १ मार्च २०१८ पासून | वित्तीय वर्ष १८–१९ | वित्तीय वर्ष १९–२० | वित्तीय वर्ष २०–२१ फ्रेबु. २०२१ पर्यंत |
|---|---|---|---|---|---|
| कालावधी अ | मुळ विद्यूतभार सरासरी ( मे. वॉ. ) | ०.२ | ०३.२५ | ०७.५० | ०७.५० |
| | वार्षिक विज मागणी (एमयू) | ०.०७ | १४.७९ | ३४.१४ | ३०.०६ |
| कालावधी ब | सरासरी कमालभार (मे.वॉ. ) | ०.४० | ६.५० | १५.०० | १५.०० |
| | वार्षिक विज मागणी कमाल भार असताना | ०.१५ | २९.५९ | ६८.२८ | ६०.१२ |
| कालावधी अ ००–०० तास ते ०९–०० आणि २१–०० तास ते २४–०० तास दिवसा दरम्यान.<br>कालावधी ब ०९–०० तास ते २१–०० तास दिवसा दरम्यान. | | | | | |

५. विज खरेदी करारातील दर हा द्विभाग दराप्रमाणे राहिल.
अ – स्थिर आकार हा विज खरेदी कराराच्या कलम ५.३ च्या अनुषंगाने मासिक करारानुसार निर्धारीत केलेल्या मागणीवर आधारीत राहिल .
ब – बदलता दर हा इंधनदर महिन्याच्या राबविलेल्या निर्धारीत वास्तविक मागणीवर आधारीत असेल. ( विज खरेदी करार कलम ५.३ अन्वये )

६. स्थिर आकार हा मासिक करार मागणीच्या ८५ % भार गुणांकावर राहील.

| तपशिल | एकक | वित्तीय वर्ष १७–१८ , १ मार्च २०१८ पासून | वित्तीय वर्ष १८–१९ | वित्तीय वर्ष १९–२० | वित्तीय वर्ष २०–२१ फ्रेबु. २०२१ पर्यंत |
|---|---|---|---|---|---|
| स्थिर आकार | रू./एकक | ०१.५९ | ०१.५६ | ०१.५३ | आयोगाच्या ठरविलेल्या दराच्या आदेशानुसार |

जर मासिक गुणांक हा मासिक कराराच्या मागणीच्या ८५ % गुणांका पेक्षा कमी असेल तर प्रत्येक अवधी करिता स्थिर आकार हा विज खरेदी करारातील परिशिष्ठ –२ प्रमाणे वाढेल

७. **विज दर**
वरीलप्रमाणे स्थिर आकारा व्यतिरिक्त, निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी हे आयोगाने टाटा पावर कंपनीच्या वीज एकक क्र. ८ च्या निर्गमीत केलेल्या मानंकानुसार व वास्तविक पडलेल्या इंधनाच्या किंमतीप्रमाणे व त्या महिन्याचे मागणी पत्रकाच्या प्रत्येक काळाच्या अवधीमध्ये निर्धारीत केलेल्या मागणीनुसार विज दराचे पैसे देईल.

८. **वितीय वर्ष २०१९–२० पर्यंत सहनिर्मित / नुतनशील विज खरेदी पूर्ण करावयाच्या जबाबदारीतून सुट मिळण्याकरीता .**
निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी नी विद्युत भारामध्ये अनियमितता असल्या कारणाने सहनिर्मित/ पुन:निर्मित वीज विकत घेण्यासंबंधी विचार केलेला नाही व त्या जबाबदारीतून २०१९–२० पर्यंत सुट मिळण्याकरीता विनंती केली आहे.

९. **बिन निर्धारीत किंवा निर्धारीत वा वास्तविक विज वापरातील तफावतीमुळे लागणाऱ्या दरापासून सुट मिळण्याबाबत.**
वास्तविक उपयोग व निर्धारित मागणीच्या तफावतीवर लागणारा भार व राज्यभार प्रेषण केंद्राचे विज निर्धारण /पुर्ण:निर्धारण करण्याच्या दरापासून सूट मिळावी असे प्रस्तावित केले आहे. कारण त्यामुळे प्रथम वर्षी विज मागणी कमी असल्याकारणाने व विज मागणी निर्धारित करण्यात अचुकता न राहण्यामुळे विजेच्या दरावर मोठयाप्रमाणात परिणाम होईल.

१०. खाली नमूद केलेल्या दस्तऐवजांच्या प्रती लेखी विनंती केल्यास निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी च्या खालील दिलेल्या कार्यालयातून मिळू शकतील.
अ. सी डी सह तपशिलवार याचिकेचे दस्तऐवज ( इंग्रजीत) (निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी यांच्या नांवे रोख /डी डी/धनादेशाद्वारा रू. ७५/–इतकी रक्कम दिल्यास )
ब. तपशिलवार याचिका दस्तऐवज ( इंग्रजीत) (रू. ५०/–इतकी रक्कम भरल्यास )
क. तपशिलवार याचिका दस्तऐवजांची सीडी (इंग्रजीत) (रू.२५/–इतकी रक्कम भरल्यास )

कार्यालय :

| कार्यालय | पत्ता | फोन /फॅक्स क्र. |
|---|---|---|
| नोंदणीकृत कार्यालय | १२ वा मजला नॉलेज पार्क, हिरानंदानी बिजनेस पार्क , पवई मुंबई ४०० ०७६ | फोन नं ( ९१–२२) २५७१५२८७/५२२३ |

११. आयोगाने निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी यांना जनतेकडून वरील याचिके संदर्भात कुरिअरद्वारा द्वारा, प्रत्यक्ष फॅक्सद्वारे किंवा ई–मेलने /हरकती मागविण्याच्या सूचना दिल्या आहेत. सदर सूचना इंग्रजी किंवा मराठीत सादर कराव्यात आणि त्याच्या १ + ५ प्रती सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग , १३ वा मजला, सेंटर क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई ४०० ००५ ( फॅक्स २२१६३९७६ ई मेल . mercindia@merc.gov.in) यांच्याकडे दि. २३.०२.२०१८ पर्यंत पाठवावी जी सेवेच्या पुराव्यासह श्री. कुणाल व्होरा, सहाय्यक उपाध्यक्ष, व्यवसाय विकास, निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी १२ वा मजला नॉलेज पार्क, हिरानंदानी बिजनेस पार्क, पवई मुंबई ४०० ०७६, फोन नं ( ९१–२२) २५७१५२८७/५२२३ ई मेल: kvohra@in.henergy.com यांच्यावर असावी आणि त्यावर पाठविणाऱ्या व्यक्तीचे संपूर्ण नांव, पत्र व्यवहाराचा पत्ता आणि ई –मेलचा पत्ता काही असल्यास द्यावा. तसेच हरकत, टिपणी एखाद्या गटाच्या संस्थेच्या वतीने दाखल करण्यात आली आहे का हे देखील नमूद करावे. सुचना किंवा हरकत पाठविणाऱ्या व्यक्तीला व्यक्तीगत स्वरूपात सुनावणी हवी आहे कि नाही याचीही नोंद त्यात करावी. या परिस्थितीत आयोगाकडून १३ वा मजला, सेंटर क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई ४०० ००५ येथे २७.०२.२०१८ रोजी ११.०० वाजता आयोजित सार्वजनिक सुनावणीच्या वेळी संधी देण्यात येईल आणि त्यासाठी स्वतंत्र सुचना दिली जाणार नाही.

१२. निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी द्वारा सुचना/ हरकत मिळाल्यापासून ३ दिवसाच्या आत प्रत्येक सुचनेला /हरकतीला उत्तर देण्यात येईल. परंतु २३.०२.२०१८ पर्यंत मिळालेल्या सर्व सुचना/हरकतीना २६.०२.२०१८ पुर्वी देण्यात येईल. निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी द्वारा देण्यात आलेल्या प्रतिसादासाठी सार्वजनिक सुनावणीच्या वेळी किंवा २८.०२.२०१८ पर्यंत पुरवण्या सादर करता येतील. तपशिलवार याचिका दस्तावेज निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी यांच्या संकेत स्थळावर http://www.henergy.com येथे डाऊलोड करता येणाऱ्या स्वरूपात ( मोफत ) उपलब्ध आहेत.

स्थळ : मुंबई
दिनांक : ०२/०२/२०१८

सही ................................
नांव : श्री कुणाल व्होरा
पद –सहाय्यक उपाध्यक्ष व्यवसाय विकास
निदार युटीलीटीज पनवेल एल एल पी